*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---

# UNIT 2
# FRIEDRICH NIETZSCHE
# फ्रेडरिश विल्हेल्म नीत्शे

2.1 सत्तेची इच्छा (Will to Power)
2.2 सत्याची संकल्पना (Concept of Truth)
2.3 नैतिकतेबद्दलचा दृष्टिकोन. (Views regarding Morality)


---

## प्रस्तावना

**यु**रोपात 19 व्या शतकात अनेक नामवंत आणि प्रज्ञावंत तत्वज्ञ होऊन गेले, त्यात नीत्शेच्या तोडीचा दुसरा कोणी दाखविता येत नाही. नीत्शे हा मौलिक प्रज्ञेचा, मुक्त प्रवृत्तीचा, स्वतंत्र आणि चैतन्यमय विचारांचा प्रतिभासंपन्न तत्वज्ञ होऊन गेला. काव्याचे, संगीताचे आणि कलांचे त्याला मनस्वी प्रेम आणि आकर्षण वाटत होते. तो अत्यंत प्रभावी आणि सामर्थ्यसपंन्न जीवनाचा पुरस्कर्ता होता. त्याचे वर्णन **कवी, तत्वज्ञ व प्रेषित** असे करण्यात येते.

नीत्शेला तत्वज्ञ होण्याची आकांक्षाही नव्हती. एका विशिष्ट कार्याकरिताच आपला जन्म आहे, अशा कल्पनेने जन्मभर तो जणू भारलेला होता. ते कार्य म्हणजे ‘‘आपला जन्म नवीन मूल्ये घडवून ती जगासमोर मांडणे’’, ही त्याची भावना होती. ‘‘आपल्या ठिकाणी लोकोत्तरत्व आहे आणि त्याचे अविष्कारण करण्यासाठीच आपला जन्म आहे’’ अशा उपजत प्रवृत्तीने तो जगत होता. जगापुढे त्याने अतिमानवाचा महान आदर्श उभा करुन आपले वेगळेपण जगाला पटवूनही दिले.

**Friedrich Wilhelm Nietzsche**
(October 15, 1844 – August 25,1900)
German philosopher, poet, composer
And classical philologist.
Wrote critical texts on religion,
morality, contemporary culture,
philosophy and science,
displaying a fondness
for metaphor, irony and aphorism.




नीत्शेचा प्रभाव केवळ तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातच पडला असे नाही तर साहित्य[1] आणि प्रत्यक्ष राजकारणावरही[2] पडला. तत्त्वज्ञानात नुकतीच उदय पावलेली अस्तित्ववाद,शून्यवाद (nihilism) आणि

---

[1]प्रसिध्द नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ (**George Bernard Shaw** .26 July 1856 – 2 November 1950, आयरिश नाटक्कार आणि The London School of Economics चा सहसंस्थापक ) आणि विसाव्या शतकातील महत्वाचा साहित्यिक डब्ल्यू. बी. यीट्स (**William Butler Yeats** 13 June 1865 – 28 January 1939) या आयरिश कवी व नाटक्कारावर चांगलाच प्रभाव पडला. शॉने नीत्शेची 'अतिमानव' ही संकल्पना नाटकात वापरली तर यीट्सच्या सर्व काव्यरचनांमध्ये नीत्शे जाणवत राहातो.


Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---

उत्तरआधुनिकवाद यावर त्याची विचारसरणी प्रभावी ठरली. त्याच्या तत्त्वज्ञानातील 'ईश्वराचा मृत्यू', 'महामानव' (Übermensch[3]-Super Human),'चिरंतन पुरावर्तन/पुनर्वतरण'[4] (the eternal recurrence), आणि 'सत्तेची लालसा' या संकल्पना कळीच्या संकल्पना आहेत. 'तीव्र जीवनेच्छा'(the idea of "life-affirmation") ही त्याच्या एकूण तत्त्वज्ञानाची मूलभूत संकल्पना असून जणू काही तिच्या भोवती त्याचे सारे तत्त्वज्ञान रचले गेले आहे.

नीत्शेचा जन्म जर्मनीतील लिपझिग शहरानजीक एका खेड्यात झाला.नीत्शेच्या पित्याचे नाव कार्ल लुडविग तर आईचे नाव फ्रान्झीस्का ओहली होते. कार्ल लुडविग धर्मोपदेशक होता. नीत्शे पाच वर्षांचा असताना कार्लचे निधन झाले. नीत्शेचे पालनपोषण आई, बहिण,आजी आणि दोन चुलत्या यांच्या देखरेखीखाली झाले.अत्यंत कुशाग्र बुध्दि असलेल्या नीत्शेला पदवीधर होण्यापूर्वीच 24व्या वर्षी विद्यापीठात भाषाशास्त्रात प्राध्यापकाची नोकरी मिळाली.

## शॉपेनहॉवर आणि वॅग्नरचा प्रभाव

नीत्शेच्या जीवनावर प्रसिध्द तत्त्वज्ञ शॉपेनहॉवर[5] आणि संगीतकार वॅग्नर (Wagner) यांचा मोठा प्रभाव होता. ते दोघेही नीत्शेचे जवळचे मित्र होते.

नीत्शेला संगीताची कमालीची आवड होती.वाग्नेरविषयी त्याने खूप चांगले ऐकले होते.तो वॅग्नरला आपला गुरु म्हणत असे. त्याला वॅग्नरविषयी परमादर वाटत असे. वॅग्नरच्या व्यक्तित्वात असलेली उत्कटता आणि प्रगाढता यांचा खोल ठसा त्याच्या मनावर उमटला होता. वस्तुत: त्यांची मैत्री झाली तेंव्हा वॅग्नर नीत्शेपेक्षा खूप मोठा, जवळपास त्याच्या वडिलांच्या वयाएवढा होता. तरीही त्यांच्यात प्रगाढ मैत्र झाले. पण नंतर वॅग्नरशी मतभेद होवून वॅग्नवर टीका करणारे The Case of Wagner हे पुस्तक नीत्शेने लिहीले. त्याचप्रमाणे वॅग्नरच्या Twilight of Gods या पुस्तकाचे विडंबन करण्यासाठी *Twilight of the Idols (1889)* हे ही पुस्तक लिहीले.

शॉपेनहॉवरशी नीत्शेचा संबंध मात्र तत्त्वज्ञानात्मक होता. 'ईश्वर अस्तित्वात नाही' आणि 'माणसाकडे अमर आत्मा नसतो' या शॉपनेहावरच्या मतांशी तो पूर्ण सहमत होता.तसेच विविध प्रकारच्या वासना आणि दु:ख

---

[2]नीत्शेच्या मृत्यूनंतर जवळपास 35 वर्षांनी पेटलेल्या दुसऱ्या महायुध्दाचे कारण म्हणजे 'अतिमानव' ही संकल्पना असावी. या संकल्पनेने अॅडॉल्फ हिटलर भारावला होता. ''जर्मनीचा जन्म जगावर राज्य करण्यासाठी झालेला आहे आणि माझा जन्म त्यासाठीच झाला आहे'' अशी त्याची धारणा झाली होती.स्वस्तिकचे चिन्ह हिटलरने नीत्शेच्या तत्त्वज्ञानातून घेतले, अशीही चर्चा आहे.अर्थात हा साराच मुद्दा वादग्रस्त आहे.

[3]Übermensch या मूळ जर्मन शब्दाचा अर्थ "Overman, Overhuman, Above-Human, Superman" असा होतो. *über* चा अर्थ श्रेष्ठता, उच्चता, सामर्थ्यवान, .. .. च्या अतीत जाणारा, सर्वाधिक किंवा अतितीव्र असा होतो. *Mensch* याचा अर्थ 'पुरुषी श्रेष्ठता' या पेक्षा 'मानवजातीचा सदस्य' असा होतो.. म्हणूनच *übermenschlich* या विशेषणाचा अर्थ 'महामानव' म्हणजे मानवी सामर्थ्याच्या पलिकडे जाणारा अथवा मानवतेच्या तुलनेत श्रेष्ठतम्' असा होतो.ही संकल्पना *Thus Spoke Zarathustra* या ग्रंथात मांडली गेली. या ग्रंथाचे पहिले इंग्रजी भाषांतर 1986 साली अॅलेक्झांडर टीली (Alexander Tille April 30, 1866 - December 16, 1912) या जर्मन तत्त्ववेत्त्याने केले. त्याने Übermensch चा अर्थ Beyond-Man असा केला. नीत्शेच्या समग्र साहित्याचा भाषांतरकार थॉमस कॉमन (**Thomas Common** (1850 – 1919) याने तो "Superman"; असा केला. तेच भाषांतर नंतर जॉर्ज बर्नार्ड शॉ याने 1903 साली *Man and Superman* या नाटकात वापरले.

[4] 'चिरंतन पुरावर्तन' ही संकल्पना *The Gay Science* च्या विभाग 341 मध्ये आणि *Thus Spoke Zarathustra* च्या "Of the Vision and the Riddle" या प्रकरणात येते.या संकल्पनेवर नीत्शे ''भयावह आणि विकलांग करणारी'' या शब्दात टीका करतो.ही संकल्पना म्हणजे कल्पना करता येईल त्याही पेक्षा जास्त ''कमालीचे ओझे'' आहे, असेही म्हणतो.

[5] शॉपेनहॉवरने हेगेल आणि हेगेलवाद्यांवर कडक टीका केली आहे. हेगेलवाद्यांना तो 'दांभिक पंडित आणि पढतमूर्ख ' म्हणत असे.हेगेलच्या चित्वादाने विश्वातील आणि माणसातील इच्छाशक्ति मारून टाकली, असे त्याचे मत होते.



2

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*


---

यांनी भरलेले हे जग पूर्ण निरर्थक आहे, हे शॉपेनहॉवरचे म्हणणेही त्याला मान्य होते.शॉपेनहॉवरने **संकल्पशक्ती (Will)** ची संकल्पना मांडली.


संकल्पशक्ती (Will) हीच जीवनाची अंतिम नियंत्रक सत्ता असून मानवाच्या सर्व इच्छा, क्रिया, विचार यांच्या मुळाशी संकल्पशक्तीचीच प्रेरणा असते,असे शोपेनहॉवर म्हणतो. ही शक्ती केवळ माणसातच नव्हे तर सर्व प्राणिमात्रांमध्ये अस्तित्व टिकवून धरण्यासाठी सदैव धडपड करणारी जिजीविषा किंवा जीवनेच्छा आहे. कसेही करुन, काहीही करुन टिकून राहावयाचेच; ऱ्हास, क्षय, मृत्यु, नाश यांना टाळत राहून स्वत:चे अस्तित्व मग ते कितीही दु:खमय असो, टिकवून धरावयाचे या प्रवृत्तीला तिला शोपेनहॉवर **जगण्याची संकल्पशक्ती (Will to Existence / Will of Live)** म्हणतो. तीच सर्व दु:खाची आदिजननी व कारण आहे. म्हणून ती व्यक्तीच्या जीवनात क्षीण आणि दुर्बल करणे हाच जीवनातील दु:खमुक्तिचा मार्ग होय, असे शोपेनहॉवरचे म्हणणे आहे.

नीत्शेची मुख्य समस्या होती : *या मूलत: निरर्थक, ईश्वरविहिन जगात माणसाने जगावे कसे ? अशा जगात कोणत्या प्रकारचे जीवन स्वत:हून समर्थनीय आहे ? जगण्यालायक आहे ?* त्याच्या या मध्यवर्ती समस्येभोवतीच त्याचे तत्त्वज्ञान रचले गेले आहे.


शोपेनहॉवरच्या 'संकल्पशक्ती' या संकल्पनेचा नीत्शे स्वीकार करतो. पण तिचा संदर्भ आणि आशय बदलतो. त्याच्या मते ही संकल्पशक्ती केवळ जीवनेच्छा नसून ती मुळात माणसातील शक्तिचाच संकल्प **(Will to Power)** असते. नीत्शेच्या मते, प्रत्येक जिवंत प्राणीमात्र केवळ कसे तरी अळणी जीवन जगण्यावर संतुष्ट न राहाता, इतरांवर मात करुन इतरांना आपले श्रेष्ठत्व दाखवून, त्यांच्यावर आपले वर्चस्व आणि प्रभुत्व प्रस्थापित करण्याची धडपड करीत असतो. प्रत्येकात सत्तेची अनिवार लालसा असते. तीच त्याला खेळवीत, नाचवीत असते. सामर्थ्य, प्रभाव, सत्ता, श्रेष्ठत्व हेच खरे शक्तिसंकल्पाचे **(Will of Power)** स्वरूप आहे. या संकल्पनेचे अधिक विस्तृत स्वरूप नंतर पाहू. तथापि शॉपेनहॉवरच्या संकल्पशक्तीपेक्षा (Will To Live) नीत्शेची संकल्पना भिन्न आहे,एवढी दखल येथे घेणे उचित ठरेल.

---

**Arthur Schopenhauer**
(22February 1788 – 21 September 1860)
German Philosopher known for his pessimism At age 25, he published Ph. D. dissertation



**Wilhelm Richard Wagner**
22 May 1813 – 13 February 1883)
German composer, conductor, theatre director and polemicist primarily known for his operas (or "music dramas", as they were later called).



---

## ग्रंथनिर्मिती

नीत्शेच्या *Thoughts out of Season*[6] या ग्रंथात *David Strauz,the Confessor and the Writer; The Use and Abuse of History; Schopenhauer as Educator , Richard Wagner in Bayreuth* या चार निबंधांचा समावेश आहे.त्यानंतर *Human All too human (1878), The Dawn of*

---

[6] या ग्रंथाचे मूळ नाव *Untimely Meditations* असे होते. *Thoughts out of Season* हे त्याचे इंग्लीश भाषांतर आहे.

---

*Day (1881)The Joyful Wisdom(1882)* आणि सर्वात मूलभूत,महत्वाचे दोन ग्रंथ: *Thus Spake Zarathustra*[7]*(1883-84), The Will to Power(1883-89)*

नीत्शे जन्मभर भटकत राहीला. त्याच्या मनात सतत अस्वस्थता आणि अस्थिरता वास करीत होती.त्याच्यावर मनापासून प्रेम करणारे, त्याला निराशेत दिलासा व उत्साह देणारे, त्याच्या सतत बदलणा-या मानसिक अवस्थांत मनापासून सहभागी होणारे असे कोणीही त्याला मिळाले नाही. त्याची निराशा आणि दु:ख तीव्र होत गेले. अशा अवस्थेत त्याने *Thus Spake.. ..* लिहीले. 'झरथुष्ट्र' हे पात्र या पुस्तकाचा काल्पनिक नायक असून तो महामानव होण्याचा प्रयत्न करतो. नीत्शेने या पुस्तकात महामानवाचा **(Übermensch - Superman)** आदर्श उभा केला आहे. सध्याच्या मानवाच्या सर्व प्रकारच्या मर्यादा, दौर्बल्य, त्रुटी, दोष, वैगुण्ये नाहीशी करुन नवा श्रेष्ठ मानव घडविणे हे या जगाचे उदिष्ट आहे व असले पाहिजे असे यात प्रतिपादिले आहे.

*The Will to Power* लिहीण्यासाठी नीत्शे बरीच वर्षे तयारी करत होता. परंतु त्याचा आजार, अधू दृष्टी, डोकेदुखी आणि मनाची अस्वस्थता सारखी आडवी येत होती. अखेर काही टिपणांच्या आधारे *Beyond Good and Evil; Genealogy of Morals* यासारखी पुस्तके प्रसिद्ध केली. या ग्रंथात माणसातील सर्व हीनत्वाचा, निम्नदर्जाचा, दुर्बलत्वाचा, व कृपणतेचा धिक्कार त्याने केला आणि त्याचवेळी माणसातील युयुत्सू, विक्रमी, धाडसी, सर्जनशील, निर्भय आणि आक्रमक वृत्तीचा पुरस्कार नीत्शेने केला आहे.

*Beyond Good and Evil* या पुस्तकावर 'अराजकाचे पाठ्यपुस्तक', 'स्फोटक सुरुंग' या शब्दांत अशी टीका केली गेली. परिणामी भूमिका स्पष्ट करण्यासाठी *Generalogy of Morals* (1887) हे पुस्तक त्याने प्रसिद्व केले. यात त्याने शिव व दुरित या मूल्यांचा आणि निर्णयबुद्वी, शिक्षा यासारख्या संकल्पनांचा उगम कसा झाला असला पाहिजे, याचे अत्यंत भेदक विश्लेषण व विवेचन केले. याचवेळी वॅग्नरवर टीका करणारी *The Case of Wagner (1888)* आणि *Nietzsche versus Wagner (1895)* ही पुस्तके लिहिली.

## अ) सत्तेची इच्छा (Will To Power) - शक्तिसंकल्प

**'सत्ता' या संज्ञेचे अर्थ :**

नीत्शेच्या तत्त्वज्ञानातील सर्वच संकल्पनांचे स्पष्टीकरण देणे आणि त्यांचा अर्थ निश्चित करणे कठिण आहे.सर्व प्रकारच्या मानवी वर्तनात आणि मूल्यांकनात 'सत्तेची इच्छा' प्रबळपणे आढळते, असे नीत्शेचे मत आहे. ही संकल्पना त्याच्या सर्व तत्त्वज्ञानात आढळते. मुख्यत: *Thus Spoke Zarathustra Beyond Good and Evil; Genealogy of Morals* या ग्रंथांमध्ये ती मांडली आहे.

*Thus Spoke Zarathustra* मध्ये तो म्हणतो," जिवंत प्राण्यांना आपली सर्व शक्ति संपूर्णपणे आविष्कृत करावयाची असते.जीवन म्हणजेच सत्ता गाजविण्याची इच्छा होय." अर्थात सत्ताशास्त्रीय दृष्टिकोनातून नीत्शेच्या 'सत्ता' या संकल्पनेला फारसे महत्व देण्याचे कारण नाही, असे बर्ट्रांड रसेल आणि वॉल्टर कौफमनचे मत आहे.

या संकल्पनेचे सर्वसाधारणपणे तीन अर्थ[8] देता येतील. ते असे :

---

[7]*Thus Spoke Zarathustra* चे मूळ जर्मन नाव: *Also Sprach Zarathustra.* या जगप्रसिध्द ग्रंथाचे पहिले इंग्रजी भाषांतर 1986 साली ॲलेक्झांडर टीली (Alexander Tille April 30, 1866 - December 16, 1912) या जर्मन तत्त्ववेत्त्याने केले. त्यानंतर नीत्शेच्या समग्र साहित्याचा भाषांतरकार थॉमस कॉमन (**Thomas Common** (1850 – 1919) याने 1903 साली नव्याने भाषांतर केले. त्याच भाषांतराच्या प्रकाशनासाठी जॉर्ज बर्नार्ड शॉने त्याच्या स्वतःच्या प्रकाशकाकडे शिफारस केली. अशा रितीने नीत्शेची जगाला ओळख झाली. पण ते पुस्तक विकले न गेल्याने प्रकाशकाचे दिवाळे निघाले !

[8]Michael Lacewing, Routldge Taylor & Francis Group
*http ://cw.routledge.com /textbooks/philosophy/ downloads/a2/unit4/nietzsche/NietzscheWillPower.pdf*
Michael Lacewing चे संकेतस्थळ : *http://www.alevelphilosophy.co.uk/*


*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---



1. **सत्ताशास्त्रीय :** जे काही अस्तित्वात आहे, ती सगळी सत्तेची इच्छाच आहे.
2. **सेंद्रीय :**जीवनाच्या सर्व आकार-प्रकारांशी सत्तेची इच्छा संबंधित आहे.
3. **मानसशास्त्रीय :** सर्व जिवंत प्राण्यांशी सत्तेची इच्छा संबंधित आहे.

**WALTER ARNOLD KAUFMANN**
(1 July 1921 – 4 September 1980)
German-American philosopher, translator, and poet.
A prolific author, wrote extensively on a broad range of subjects.
He is renowned as a scholar and translator of Nietzsche.



'सत्ता' ही सर्वत्र आविष्कृत होते. सभोवतालचे वास्तव जग किंवा ज्यास *सत्य* म्हणतात ती सत्ता आणि दुसरा अर्थ इतरांवर अधिकार गाजविण्याची प्रत्येक माणसातील इच्छा. अर्थात हे दोन्ही अर्थ एकमेकांशी जोडले गेले आहेत, असे नीत्शे म्हणतो. हे त्याचं तर्कशास्त्र समजावून घेणे आवश्यक आहे.

## मानवी सत्ताकांक्षेचे स्वरूप (माणसातील सत्तेची इच्छा)

नीत्शेच्या मते,'आपल्या संवेदनाच्या आणि आपल्यामागे वसणारी,त्यांना धारण करणारी सत्ता एकच आहे आणि ती संकल्पशक्ती (Will)[9]' होय. तीच माणसातील ज्ञानप्रक्रियेत दिक, काल आणि नानात्व या उपाधी निर्माण करते, असे (शॉपनेहॉवरसारखे) नीत्शेचे मत आहे. ही शक्ती अनेक रुपांनी भासत असते. या जगातील सर्व वस्तू, बदल, जन्म, मृत्यु आणि वस्तूंचे विनाशीत्व सर्व भासमय (Appearance) आहे. नीत्शेच्या दृष्टीने सर्वाच्या मुळाशी वैश्विक संकल्पशक्ती (World-will) आहे. आणि ती स्वत:च एखादया स्वप्नाप्रमाणे स्वत:चे व्यक्त रुप बाहेरच्या जगात उभे करते. 'आपले जग आणि आपण' हे या शक्तीला दिसणारे स्वप्न आहे. संकल्पशक्ती हीच माणसाचे खरे स्वरुप आहे, असे नीत्शेचे मत आहे.

नीच्छेच्या मते मानवाच्या जीवनातील मुख्य प्रेरणा केवळ जिवंत राहाण्याची, कसेतरी जगण्याची आणि अस्तित्वात टिकून राहण्याची नसून प्रत्येकाला अधिकाधिक सामर्थ्य आणि इतरांवर सत्ता गाजविण्याची, श्रेष्ठत्वाची, स्वामित्वाची दुर्दम्य इच्छा असते. ही जीवनेच्छा उग्र स्वरूपाची असते. प्रत्येक जिवंत व्यक्तीला "आपण वाढावे, मोठे व्हावे, विस्तार पावावे आणि इतरांना आपल्या कक्षेत त्यांचे स्वामी व्हावे" असे तीव्रतेने वाटत असते.

स्पर्धेमध्ये भाग घेऊन विजयी व्हावे, इतरांवर छाप पाडून आपले श्रेष्ठत्व व वर्चस्व प्रस्थापित करावे काही नवे, सुंदर, भव्य, दिव्य, रोमांचकारी निर्माण करावे, तसेच निसर्गावर, मानवावर आणि इतर शक्तीवर आपले श्रेष्ठत्व आणि वर्चस्व गाजवावे, स्वत:चा दिमाख दाखवावा, झगझगाटाने इतरांना दिपवून टाकावे अशा सर्व इच्छा आणि प्रवृत्ती ही नीत्शेच्या मते 'शक्तीसंकल्प' च्या निर्देशक आहेत. केवळ अन्न, वस्त्र, निवारा यांनी माणूस जगत नाही. 'स्वामित्वाची, सत्तेची लालसा' ही सर्वात उग्र प्रेरणा कार्यरत असतेच', असे तो मांडतो.

नीत्शे म्हणतो की, जगात जे काही सडके, कुजके आणि पोकळ असते, त्याचा चक्काचूर करुन टाकणा-या भूकंपासारखी ही सत्तेची अभिलाषा असते.ती जशी बलवान लोकांमध्ये असते तशी अत्यंत कृश, क्षीण, दुर्बल

---

[9] या जगातील असंख्य भेदांचा, नानात्वाचा आणि वस्तूंचा उगम कसा झाला ? याचे उत्तर ख्रिश्चन तत्वज्ञानाने '**जेनेसिस**' या बायबलच्या प्रकरणात दिले. नीत्शे या सिध्दांतास विरोध करतो.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*



लोकांमध्येही असते. 'इतरांपेक्षा आपण मोठे, शहाणे, शूर आणि श्रेष्ठ आहो' असे प्रत्येक जण मरेपर्यत जगाला दाखविण्याचा प्रयत्न करीत असतो. नीत्शेच्या मते मानवाला सुखापेक्षाही उच्च स्थान, मोठेपणा, किर्ती, सत्ता या गोष्टी पाहिजे असतात. त्यांच्यासाठी मग तो गरज पडल्यास सुखावर पाणी सोडायलाही तयार होतो. सत्तेसाठी आणि श्रेष्ठत्वासाठी कितीही कष्ट,दु:ख, त्रास सोसावे लागले तरी तो त्यांची पर्वा करीत नाही. स्वाभिमान, अस्मिता,स्वत्व अशी नावे आपल्या या सत्ताप्रेरणेसाठी तो वापरुन तिचे रक्षण करण्यासाठी सर्वस्व पणाला लावण्यास तयार होतो.

आपल्या विकारांचे आणि कामवासनांचे उदात्तीकरण करुन त्यांचा सर्जकतेने उपयोग करुन मानव पशुत्वातून बाहेर पडून उन्नत होऊ शकतो, अणि उच्च दर्जाची प्रतिष्ठाही मिळवू शकतो. असा पशुत्वाच्या पलीकडे जाऊन उच्च पातळीवर जगणारा मानव अतिमानव (Superman : Ubermenschen)होतो. अशी माणसे प्रत्येक कालखंडात होत आलेली आहेत हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

बल, सामर्थ्य आणि सत्ता (Power) मिळविणे हे मानवाचे ध्येय असते असे नीच्छे म्हणतो, परंतु हे सामर्थ्य नेमके कोणत्या प्रकारचे असते ?ते मानवजातीच्या विकासाशी जोडलेले असते. ते मानवजातीच्या अन्तर्हित शक्तीचे पूर्ण आणि समग्र उत्फुलन आणि प्रस्फुटन (Effiorescence) असते. हे सामर्थ्य म्हणजे मानवातील अप्रकट क्षमतांना पूर्ण मोहोर आणि बहर येणे असते. हे सामर्थ्य चैतन्याने रसरसलेले, उफाळणारे, आणि दुर्दम्य असते. त्याचा कोणालाही धाक वाटावा असे ते असते. मात्र हे केवळ सामर्थ्य असते. ते नैतिक दृष्टीने चांगले किंवा वाईट यापैकी कसही नसते. ते शिवाशिवाच्या, शुभाशुभाच्या पलीकडे असते.

**सत्ता आणि संकल्पशक्ति**

येथे सत्ता आणि संकल्पशक्ति यातील फरक समजावून घेणे आवश्यक आहे. नीत्शेच्या मते, 'ज्या सत्तेचे आपणांस ज्ञान होऊ शकते आणि ज्या सत्तेचे आपण व्यक्त आविष्कार आहो' अशी एकमेव सत्ता म्हणजे ही शक्ती (Force) आहे. जीवन हे या विश्वव्यापी शक्तीचा अविष्कार (Universal Force) आहे. आणि जगण्याचा अधिकाधिक चांगला अनुभव घेणे हाच या जीवनाचा नियम आहे.'

विश्वात सर्वत्र आपणांस हाच एक जगण्यासाठी सतत चालणारा संघर्ष पाहावयास मिळतो. या संघर्षात बलिष्ठ दुर्बलांचा संहार करतात, आणि जगण्याची पात्रता ज्यांच्यापाशी असते तेच जगण्यात यशस्वी होतात. या जीवनसंघर्षास जे विचार पोषक व उपयुक्त ठरतात ते नैतिकदृष्टया योग्य व चांगले ठरतात. याप्रमाणे सर्वाच्या मुळाशी सत्य म्हणून जे आहे ते म्हणजे ही शक्ती मिळविण्याची इच्छा किंवा संकल्प होय. हाच संकल्प अनेक आणि विविध रुपे घेऊन विश्वात सर्वत्र कार्य करताना दिसतो. तोच सर्वाच्या जीवनात अंतर्हित असतो. आणि तोच प्रत्येकास अधिकाधिक सामर्थ्य अनुभवण्याची प्रेरणा देत असतो. मानवाच्या सर्व सत्य-असत्य, योग्य-अयोग्य चांगले-वाईट या विषयांच्या कल्पनांच्या मुळाशी सर्वाना व्यापून राहाणारी, धारण करणारी आणि सर्वाना प्रेरणा देऊन खेळविणारी एकच अंतिम शक्तिसंकल्पाची सत्ता आहे.

मानवाचे मन, बुद्वी, वृत्ती, प्रवृत्ती, सदसविवेकबुद्वी ही सर्व तिची वृत्ती करण्यासाठी वापरात असणारी साधने आहेत असे नीत्शे म्हणतो त्यात तथ्य आहे. पण सर्वच जगाची रचना मानवाच्या बुद्वीने व मनाने केलेली आहे, हे त्याचे म्हणणे तितकेच अयोग्य आहे.

## सत्याची संकल्पना

सत्य म्हणजे काय ? ही सत्ताशास्त्रीय संकल्पना आहे. तथापि आपण आधी पाहिल्याप्रमाणे याविषयी नीत्शेचे मत फारसे विचार करण्यासारखे नाही. कारण त्यात सत्ताशास्त्राची कोणतीही लक्षणे नाहीत, त्यामुळे ही मते स्वीकारण्याजोगी नाहीत, असे मत रसेल व कौफमन या दिले आहे. तरीही नीत्शेला काय म्हणावयाचे आहे, ते थोडक्यात पाहू.

नीत्शेच्या मते सामर्थ्याचा विकास होण्याच्या अनुभवावरुन सत्य ठरवावे. म्हणजे जे जे सामर्थ्याच्या वाढीला उत्तेजक ठरेल ते ते सत्य होय. आणि जे जे मानवाच्या ठिकाणी दुर्बलता, अगतिकता, विषण्णता आणि दु:ख यांना पोषक ठरेल ते ते असत्य समजावे. मानवाची विचार करण्याची प्रवृत्ती जीवनशक्तीचे साधन म्हणूनच

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---

कार्य करीत असते. मानवाच्या सर्व कल्पना, विचार, प्रवृत्ती, भावना ही सर्व एकाच प्रवृत्तीचे अविष्कार असतात.ती प्रवृत्ती म्हणजे सत्तेची लालसा.

सत्य म्हणजे मानवजातीच्या बाहेर दूर कोठेतरी बसणारी, स्वतंत्र, अविकारी आणि मानवतेपेक्षा श्रेष्ठ अशी वस्तू नसते, तर मानववंशाला टिकवून ठेवणारे आणि उपयोगी असे ते 'तत्त्व' असते. सत्य हे जगण्याच्या संघर्षातील उपयुक्त साधन आहे.

### सत्याची सापेक्षता

ज्ञान किंवा सत्य हे नेहमी विशिष्ट परिस्थितीतच सत्य ठरते आणि परिस्थिती बदलल्यानंतर वेगळ्या प्रकारच्या परिस्थितीत असत्य होण्याची भरपूर शक्यता राहाते. याचा अर्थ एकच विचारप्रणाली सर्व काळात आणि विभिन्न परिस्थितीत सत्य ठरेलच,असे म्हणता येणार नाही.परिस्थितीच्या आवश्यकतेप्रमाणे कल्पनांचे योग्यायोग्यत्व किंवा सत्यासत्यत्व ठरत असते.

त्या कल्पना आणि विचार वस्तुस्थितीशी यथार्थपणे जुळल्या तरच त्यांना सत्यत्व प्राप्त होते. जुळणी झाली नाही तर त्या असत्य ठराव्या, हे स्वाभाविक आहे. एवढेच नव्हे तर, ज्या कल्पना, संकल्पना, किंवा विचारसरणी आज सत्य असतील त्या भविष्यकाळात परिस्थिती बदलल्यानंतर त्या परिस्थितीशी जुळल्या नाहीत तर पूर्णपणे असत्यही ठरतील, आणि म्हणून त्यांचा त्याग करावा लागेल, त्यावेळी आवश्यक आणि योग्य अशा कल्पनांची घडण करावी लागेल.

अशा रितीने सत्य हे गतिमान असते आणि परिस्थितीनुसार त्यात परिवर्तन होत असते. ते सापेक्ष असते. त्याची निर्मिती शक्तीसंकल्प करीत असते. आणि ते जीवनसंघर्षात टिकून राहाणारे असते. ( एका अर्थाने भारतीय तत्त्वज्ञानातील वेदान्ताची त्रिकालाबाधित सत्याची - ब्रह्माची कल्पना नीत्शेला मान्य नाही. सत्य अमूर्त, जीवनाशी संबंध नसणारे, केवळ काल्पनिक, तार्किक व कृत्रिम नसते.)

नीत्शेची सत्याविषयक सापेक्षता अन्य एका सिध्दान्ताला जन्म देते. तो म्हणजे दृष्टिकोणवाद. सत्याविषयक सापेक्षता आणि दृष्टिकोणवाद परस्पर निगडीत आहेत.

### ईश्वराचा मृत्यू , शून्यवाद आणि दृष्टिकोणवाद

दृष्टिकोणवादानुसार कोणतीही चित्संकल्पना विशिष्ट दृष्टिकोणातूनच आकाराला येते. याचा अर्थ असा की ज्यात सत्यविषयक अथवा मूल्यविषयक विधान करता येईल अशी अनेक संकल्पनात्मक सिध्दांतने करणे शक्य आहे. पण परिणामी जगाकडे पाहण्याचा कोणताही दृष्टिकोन सत्य नाही, सापेक्ष आहे, असा निष्कर्ष निघतो.दुसरा अर्थ असा की सर्व दृष्टिकोण एकाच पातळीवर वैध नाहीत, असेही सिध्द होते. म्हणजे सत्य, ज्ञान या संकल्पना नेहमीच सापेक्ष राहतात.

नीत्शेचा सापेक्षतावाद अथवा दृष्टिकोणवाद त्याच्या 'ईश्वर मेला आहे' या घोषणवर अवलंबून आहे. ही नीत्शेची प्रसिध्द घोषणा त्याच्या मुख्यत: *The Gay Science* या ग्रंथात येते.या घोषणेमुळे अनेकजण नीत्शेला निरीश्वरवादी समजतात तर कौफमनसारखे विचारवंत मात्र ही घोषणा म्हणजे नीत्शेचा अध्यात्मवाद व ईश्वरवाद खूप सूक्ष्म असल्याचे सांगतात. नीत्शेच्या मते आधुनिक विज्ञानातील विकास आणि युरोपीयन सोसायटीतील सेक्युलॅरिसझमनेच ''ईश्वराची हत्या'' केली आहे. वस्तुत: ईश्वर संकल्पनेने या समाजाचे किमान हजार वर्षे तरी पोषण केले आहे. जगण्याला मूल्यांची बैठक देवून अर्थपूर्ण बनविले आहे.

नीत्शेच्या मते ईश्वराच्या हत्येमुळे वस्तुजगताविषयीचा सार्वत्रिक स्वरपाचा दृष्टिकोनच हरपला आहे आणि त्याचबरोबर वस्तुनिष्ठ सत्याची कल्पनाही नाहीशी झाली आहे. हे मानवजातीचे खूप मोठे नुकसान आहे.परिणामी आम्ही ईश्वराविषयी अनेकांगी, चचंल आणि विसंगतीनी भरलेले दृष्टिकोण विकसित करून बसलो आहोत. नीत्शेच्या या मताला 'बहुआयामी दृष्टिकोणवाद' म्हणतात.

तथापि या दृष्टिकोणवादामुळे एक प्रकारचा नकारात्मक शून्यवाद आकाराला आला, असा नीत्शेचा आक्षेप आहे.शून्यवाद म्हणजे परंपरेने आम्हाला कोणतीही दैवी परंपरा दिली नाही आणि जीवनाला काहीही हेतू

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---

नाही, ते निरर्थक आहे, असा विचार. साहजिकच जीवन पोकळ व आशयहीन झाले आहे. सत्तास्पर्धा वाढली आहे.ते माणसाला मारक आहे, असे नीत्शे समजतो. यातून नीत्शेचे तथाकथित नीतीशास्त्र विकसित झाले.

## नैतिकतेबद्दलचा दृष्टिकोन (नीतीमीमांसा)

नीत्शेच्या मते आधुनिक युरोपात नीतीच्या क्षेत्रात एक प्रकारचे अराजकच माजले होते. ईश्वराच्या भीतीवर व प्रेमावर आधारलेली पारंपरिक नीति क्षीण होऊन कोसळून मृत बनली होती. नीतीचे नवे अधिष्ठान तयार झाले नव्हते. समाजातील ऐक्य नष्ट होऊन व्यक्ती स्वांतत्र्याला अतिरेकी महत्व येत चालले होते आणि प्रत्येक व्यक्ती स्वतंत्रपणे जगू पाहात होती. थोडक्यात फुटीरपणा वाढून समाजाचे कमालीचे विघटन झाले होते. समाज विघटणची ही अवस्था नीत्शेला भयानक वाटत होती.समाजात गोंधळ, विस्कळीतपणा आणि बेदिली असणे हे त्याच्या मते, दृष्टीने धोक्याचे होते.

या सर्व गोंधळाच्या मुळाशी असणारे मुख्य कारण म्हणजे सर्वसामान्य असे नीतीचे निकष ठरले नव्हते. काहीच्यां मते उपयुक्तता (Utility) हा नीतीचा निकष होता, तर तीच नीती इतरांना अयोग्य वाटत होती. आचरण्यास कठीण अशा गोष्टी लोकांना आदरणीय वाटत असत, त्याउलट आचरण्यास सोप्या गोष्टी इतरांना अधिक योग्य वाटत असत. नैतिक क्षेत्रातील ही अराजकता पाहून नीत्शे गोंधळून गेला होता.

### नीति-सापेक्षता

नैतिक क्षेत्रातील या अंदाधंदीतून, अराजकातून आणि बजबजपुरतून बाहेर कसे पडायचे यावर नीच्छेने अत्यंत गंभीरपणाने विचार केलेला होता आणि यावर उपाय शोधणे हीच त्याची प्रभावी प्रेरणा होती.

या प्रश्नाकडे नीच्छे गंभीरपणाने पाहातो आणि त्याचे चिकित्सक रीतीने विश्लेषण करुन त्याच्या मुळाला जाऊन भिडू पाहातो. ज्याला एक दृष्टीकोन चांगला म्हणतो त्यालाच दुसरा वाईट म्हणतो, हे कसे घडते? नीतीनिर्णयात घडणारी ही सापेक्षता (Relativity) खरी मानली तर नीतीचे आदर्श स्थलकालनिरपेक्ष आणि निरुपाधिक(Absolute and unconditional) कसे म्हणता येईल? या मूलभूत प्रश्नाने नीत्शेला अस्वस्थ केलेले होते. यातून त्याच्या Genealogy of Morals आणि Beyond Good and Evil या पुस्तकांचा जन्म झाला.

नीच्छेने Human All too human या पुस्तकात नीतीच्या तत्वाचा उगम कसा झाला असला पाहिजे, याचा उहापोह केलेला आहे. त्याच्या मते, मानव आणि पशु यांच्यात मुख्य फरक असा की पशु हे केवळ त्याक्षणाच्या गरजा व इच्छा भागल्या की समाधानी होतात. मानव त्याक्षणाच्या, इच्छेच्या तृप्तीवर समाधान पावत नाही. किंबहुना तो केवळ समाजातील प्रस्थापित नीतिनियम सर्वांना मान्य आहेत, असे वाटून भीतीने म्हणा की संकोचाने त्यांचे स्वछेने पालन करु लागतो.

नीतीला सामूहिक व सामाजिक जीवनाच्या संदर्भातच अर्थ येतो. नीतिचे खरे लक्षण व्यक्तीस होणारा उपयोग नसून तिचा आचार करण्यासाठी व्यक्तीच्या मनावर असणारा समाजाचा अधिकार (Authority) हे होय. नीतिचे वस्तुनिष्ठ स्वरुप तिच्या आचारपद्धतीतून व्यक्त होते. आणि ती आचार पद्धती म्हणजे प्रदीर्घ काळापर्यत प्रस्थापित झालेली आणि कार्य करणारी सामाजिक सवय होय.

### कळप-नीता '

नीत्शेच्या मते प्राचीन काळी व्यक्ती प्रामुख्याने समूहाच्या आधीन होती आणि तिला समूहाव्यतिरीक्त आणि समूहाबाहेर स्वत:चे वेगळे व स्वतंत्र अस्तित्व नसे. ती समाजात पूर्णपणे विरुन गेलेली असे, आणि नंतर हळूहळू तिला स्वतंत्र आणि व्यक्तित्व प्राप्त होऊन तिचा व्यक्ती म्हणून खूप उशीरा उगम झाला. समाज हा कराराच्या रुपाने आस्तित्वात आणलेला नसून समूह-प्रवृत्ती [Herd instinct ] किंवा कळप करुन राहण्याची प्रवृत्ती प्रारंभापासून होती, आणि ती अत्यंत प्रभावी होती.

समाजाच्या धारणेसाठी, स्वास्थासाठी, ऐक्यासाठी आणि विकासासाठी जे गुण आणि ज्या प्रकारचे वर्तन अनुकुल, साहाय्यक आणि पोषक होते ते, म्हणजे आचारपद्धतीला नीतिनियम समजण्यात येऊन ते चांगले मानण्यात आले. जे समाजाच्या ऐक्याला, धारणेला, स्वास्थाला, विकासाला प्रतिकूल, रोधक, बाधक आणि

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner



8

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---

विघातक ठरु लागले ते वाईट, अयोग्य आणि दुरित समजण्यात येऊ लागले. आणि त्याचा आचार करण्यावर समाजाने टिका करुन त्यावर निर्बध घालण्यात येऊ लागले. म्हणजे जे व्यक्तीचे गुण समूहाच्या किंवा वर्गाच्या (group : heerden] ऐक्याला, रक्षणाला,धारणेला, विकासाला आणि उत्कर्षाला पोषक ठरले ते नैतिक सदगुण मानण्यात येऊ लागले. यांचा आचार प्रत्येक व्यक्तीने केला पाहिजे अशी त्या वर्गाची मानसिक सक्ती व्यक्तीवर होऊ लागली.

समूहाची किंवा वर्गाची दृढता व घनता व्यक्तीच्या सुखी जीवनाची एक अत्यावश्यक अट असते. या गुणांचे व नियमांचे पालन न झाले तर तो वर्ग किंवा समूह ठीसूळ किंवा खिळखिळा बनून त्याचे विघटन होऊ लागते म्हणून वर्गाचे किंवा समूहाचे हित, स्वास्थ, दृढता हीनैतिकदृष्ट्या चांगली किंवा योग्य ठरविण्याचा निकष बनला, आणि त्याला बाधक जे जे घडले ते वाईट, आणि अनिष्ट व अयोग्य समजण्यात येऊ लागले. म्हणजे वर्गहीत हे प्रमूख लक्षण बनले, आणि त्याच्या अनुरोधाने नैतिक योग्यायोग्यतेसंबंधीचे निर्णय घेण्यात येऊ लागले असे नीत्शेचे मत आहे. या नीतीला नीत्शे ‘कळप-नीती’ म्हणतो.

## नीतीची जननी भीती

अशा कळप नीतीच्या मुळाशी भीती, धाक या गोष्टी अप्रत्यक्षपणे कार्य करीत असतात. त्यांना ‘नैतिक सदगुण’ असे गोंडस नाव आणि रुप दिले जाते. नीत्शेच्या मते, सर्व नीतीचा जन्म केवळ भयातूनच होतो. समूहाशी एकरुप होऊन राहाण्यात व्यक्तीला सुख, आनंद व समाधान वाटले पाहिजे, अशी नैतिक शिकवण समाज व्यक्तीला तिच्या बालपणापासून देत असतो. जोपर्यत व्यक्ती समाजाशी मिसळून राहाते,समाजाशी एकरुप व निष्ठांवत राहते तोपर्यत तिची सदसद्विवेकबुद्दी चांगली समजली जाते, आणि जेव्हा ती समूहाला किंवा समाजाला झुगारुन देऊन आपले हित साधण्याचा प्रयत्न करते, स्वत:चे व्यक्तीमत्व स्वतंत्र आहे असे समजते, तेंव्हा तिला धमकावण्यात येते.

जेव्हा एखादी व्यक्ती समाजाचे हे बंधन, दास्य, सक्ती मान्य करावयास तयार होत नाही, आणि आपले स्वत:चे अध्यात्मिक स्वातंत्र्य टिकविण्यासाठी आत्मसमर्थन करण्यास धीराने उभी राहाते, तेव्हा अशा स्वतंत्र तेजाच्या आणि सामर्थ्याच्या व्यक्तीकडे समाज धोकेबाज आणि विघातक म्हणून पाहू लागतो, आणि अशी व्यक्ती स्वतंत्र, स्वयंप्रज्ञ आणि सामर्थ्यशील व्यक्ती समाजाची हानी करणार आहे अशी हाकाटी पिटून तिला दडपून टाकून समाज नियंत्रणाखाली आणू पाहातो.

## प्रभु-नीती आणि दास-नीती

नीत्शे नीतीचे दोन प्रकार करतो :

1] श्रेष्ठ वंशाच्या लोकांची, प्रभूंची, बलवंतांची किंवा मालकांची (Masters)

2] कनिष्ठ दर्जाच्या लोकांची, दुर्बलांची, दासांची (Slaves) नीती.

नीत्शेच्या मते मानवजातीचा इतिहास हा बलवान -श्रेष्ठ वंशीय आणि दुर्बल-कनिष्ठ दर्जाच्या दासांच्या जीवन आणि श्रेष्ठत्वाचा संघर्षाचा इतिहास आहे. जो बलवंतांचा, समर्थाचा, मालकांचा (Herr) किंवा श्रेष्ठ लोकांचा वर्ग होता त्यात अंतर्भूत असणारे लोक बलवान शूर, साहसी, धाडसी, हिंस्त्र आणि नीति-अनीतिची चाड न बाळगणारे असे होते. ते धष्टपुष्ट असून त्यांचे शारीरीक बळ प्रचंड असे. ते इतरांवर सत्ता चालवून त्यांना आपलया कह्यात आणि आज्ञेत ठेवीत. या रीतिरिवाजांना प्रभु-नीती (Master-morality) म्हणतात.

प्रभु लोक शूर, धाडसी, निर्भय, धीट आणि साहसी वृत्तीचे असतत. ते समग्र मानवजातीचे अस्तित्व अवलंबून असणाऱ्या गहन आणि धोक्याच्या प्रश्नांना हात घालतात. ते सर्व गोष्टीच्यां मुळाला आणि रहस्याला जाऊन भिडत.ते उच्च दर्जाचे बुद्विवादी व विचारवंत असतात. युद्वात निर्भयतेने व शौर्याने लढतात. त्याच निर्भयतेने ते जीवनमूल्ये घडवतात. ते अधिक पूर्ण मानव होते. ते कोणत्याही क्षेत्रात उच्च स्थान पटकावतात. कारण त्यांच्या ठिकाणी असे श्रेष्ठत्व मुळातच असे. ते नेहमी सर्वत्र आघाडीवर असत.साहस,युद्व,शिकार,नाच-गाणी आणि विविध कलांत भाग घेण्यात त्यांना विशेष आनंद वाटतो. ते कधीही किरकोळ कामे करीत नाहीत आणि कष्ट करीत नाहीत. ते इतरांना आपल्या हाताखाली राबवून घेतात आणि इतरांवर आपली मालकी मिरवितात. आपला दिमाख,

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---

बडेजाव, मोठेपण, श्रेष्ठत्व यांचे प्रदर्शन करण्यात त्यांना विशेष अभिमान वाटतो.ते स्वत:ला चांगले समजतात. त्यांच्या मते चांगुलपणा म्हणजे शौर्य, कठोरता, साहसीपणा, बेडरपणा आणि उच्च दर्जाची अभिरुची होय. इतरांविषयी सहानुभूती, कळवळा आणि परहिततत्परता दाखविणे यात त्यांना मोठेपणा वाटत नाही, उलट आपले बळ, श्रेष्ठत्व, श्रीमंती, बडेजाव यांचे प्रदर्शन करण्यात त्यांना अभिमान वाटतो. सामान्य बुद्वीच्या, कुवतीच्या, दुर्बल आणि गरीब लोकांकडे ते तुच्छतेने आणि तिरस्काराने पाहून त्यांना कस्पटाप्रमाणे वागवितात.

याउलट दुसरा दुर्बलांचा आणि दासांचा वर्ग आहे, आणि त्यांची नीती दासांची नीती (Slave-morality) आहे. हे लोक स्वयंपूर्ण नसतात, परावलंबी व दुर्बल असतात. त्यांना कायमच इतरांचे साहाय्य व कृपा यांची गरज असते. ते शारीरीक कष्ट करणारे असतात, आणि ते बलवंतांना घाबरुन असतात, आणि त्यांची सर्व प्रकारची हमाली कामे करुन त्यांची सेवा करीत असतात.

10

दुर्बलांची संख्या नेहमीच मोठी असते. (अलीकडच्या परिभाषेत त्यांना जनता (People,mass) म्हणतात.)ते सर्वसामान्य, विनम्र,शालीन, स्वभावाने गरीब असतात. आणि ते मेढयाच्या किंवा गाईगुरांच्या कळपाप्रमाणे असतात. पूवी राज्यकर्ते अगदी थोडया व्यक्ती असत आणि इतर सर्व त्यांच्या अंकित व आधीन असत. परंतु सध्याच्या काळात दास किंवा गुलाम (Slave) हा शब्द अपमानकारक आणि हिणवणारा वाटतो.

बलवंतांच्या वर्ग आणि दासांचा वर्ग हे दोन्ही वर्ग परस्परांकडे स्वाभाविकपणे असूयेने आणि तिरस्काराने पाहातात. नीत्शेच्या मते हे बलवंताचे आणि दासांचे वर्ग वांशिक भेदावर आधारलेले आहेत. जे जन्मत:च समर्थ आणि बलवंत असतात तेच राज्यकर्ते शासक, नेते होतात. कारण त्यांच्या ठिकाणी आपलया श्रेष्ठत्वाची जाणीव असते. दुर्बलांवर व सामान्यांवर वर्चस्व गाजवून, आणि त्यांना अंकित ठेवण्याचा आणि त्यांच्यावर राज्य करण्याचा आपणांस जन्मत:च अधिकार आहे असे हे बलवंत सत्ताधीश गृहीतच धरतात.

या दोन वर्गात एक वृत्ती आणि समज साधारण दिसतो, आणि तो म्हणजे त्या दोघांना आपली जाती (species) किंवा वर्ग सतत चालू ठेवण्याची आणि जमल्यास सत्ताधीश बनण्याची अभिलाषा असते. दोन्ही वर्गाची किंवा जातीची चांगल्या विषयीची संकलपना आपल्याच वर्गाच्या हिताभोवती गुंफलेली असते. आणि त्यांची हिते परस्परविरुद्व असतात.

**परस्परांवलंबी जीवनव्यवस्था**

नीत्शेच्या मते या दोन वर्गाचे परस्परविरोधी असतात हे जरी खरे असले तरी ते परस्परांवर अवलंबून असतात. त्यांना परस्परांचे सहकार्य आणि साहाय्यही लागतेच. आपल्या सर्वागीण सरंक्षणासाठी जनता शास्त्यांवर अवलंबून राहाते. तर अनेक समाजातील विविध प्रकारची खालच्या दर्जाची कामे करण्यासाठी शास्त्यांचे जनतेशिवाय भागत नाही. त्यांचे हितसंबंध विरोधी असलयाने ते परस्परांस बाधक समजतात. तरीही आपला वर्ग टिकविण्यासाठी सतत जागृत राहातात.

थोडक्यात,शास्त्यांची, बलवंतांची नीती ही आत्मप्रशंसेची किंवा आत्मानुमोदनाची आहे. तर शासित जनतेची किंवा दुर्बलांची नीती उपयुक्ततेची आहे. सर्वसामान्य लोक दुबळे व परावंलबी असतात, आणि म्हणून आपल्या हिताला जपण्यासाठी ते फार तत्पर असतात. आणि म्हणून आपणांस जे उपयुक्त किंवा हितकारक असेल त्याला नैतिकदृष्टया चांगले म्हणतात, आणि जे बाधक असेल त्याला ते वाईट म्हणतात.

## जगाचे स्वरुप : कणखर वास्तववाद

'जग म्हणजे काय? या जगाचे स्वरूप काय? जग कशाने बनले आहे?' हे जगाविषयीची सत्ताशास्त्रीय प्रश्न आहेत. प्रत्येक तत्त्ववेत्ता त्यांची उत्तरे देतो. नीत्शेनेही ती दिली. यातून त्याचे सत्ताशास्त्र विकसित झाले.

नीत्शेचा जगाकडे पाहण्याचा दृष्टीकोन कठोर वास्तववादी आहे. तो म्हणतो की जगाविषयीचे आशावादी किंवा निराशावादी दृष्टीकोन मांडणारे शब्द वापरणे आता सोडून दिले पाहिजे. त्याचप्रमाणे जगाचे वर्णन चांगले आणि वाईट या शब्दांनी करणे हे सुद्वा बरोबर ठरणार नाही. कारण चांगले आणि वाईट या शब्दांना मानवी संदर्भ

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

असतो. जगाचा गौरवही करु नये किंवा त्याची निंदाही करु नये. फार तर जगाविषयी अनुकुल किंवा प्रतिकुल भूमिका आपणांस घेता येईल.

नीत्शेच्या मते, जग ईश्वरविहीन (Undivine), नीतिविहीन (Unmoral) आणि मनुष्यत्वहीन (Unhuman) आहे. आपल्या जीवनात सर्वत्र हिंसा, लूटमार, विविध प्रकारचे अपप्रकार, हत्या हीच सर्व मुळात भरलेली असतात. या जगात अशुभ, दुरित, अमंगल यांचाच सुळसुळाट आहे. न्याय आणि दयाभाव यांच्यावर आधारुन या जगाचे शासन करणे विवेकशक्तीला शक्य नाही.

या सर्व विचारांच्या मागे नीत्शेचा मुख्य विचार आहे तो असा की आपण ज्या मूल्यांना देवाइतके महत्व देतो ती न्याय, प्रेम आणि शिवत्व यांसारखी मूल्ये नेमकी काय असतात? खरे म्हणजे न्याय, प्रेम आणि शिवत्व यासारखे गुणांमुळे सामूहिक मानवी जीवनाला नैतिक दर्जा लाभतो. सामूहिक जीवनात आपणांस ज्या गोष्टींचा [गुणांचा] उपयोग होत असतो त्यांना आपण दिव्य रुप देतो, आणि त्यांचा पूर्ण आदर्शासारखा उपयोग करुन जे जे त्यांच्याशी जुळणारे असेल ते ते चांगले आणि जे जे जुळत नसेल ते ते वाईट ठरवितो.

जगाच्या स्वरुपाविषयीचे नीत्शेचे मत थोडक्यात खालिलप्रमाणे मांडता येईल.

**1] सेंद्रीयता नाही :** जगाला जिवंत किवा सेंद्रिय वस्तू समजण्यापासून सावध राहिले पाहिजे.

**2] यंत्र नाही :** जग हे एखादया यंत्राप्रमाणे आहे असेही समजू नये. कारण यंत्राची रचना एखादे उदिष्ट साध्य करुन घेण्यासाठी केलेली असते. जगाच्या रचनेच्या मागे असे कोणतेही उदिष्ट दिसत नाही.

**3]गोंधळ व अव्यवस्थापूर्ण :** जगातील व्यवहार आणि ग्रंहांच्या गती अत्यंत व्यवस्थित आणि नियमांनुसार होत असतात, आणि अपघांताना जागाच नसते, असेही आपण समजू नये. जगात गोंधळ असून व्यवस्था आणि सौंदर्य यांचाही अभाव आढळतो.

**4]मूल्यहीनता :** जगाची निंदाही करु नये, तशीच स्तुतीही करु नये. जगाला निर्दयता व कठोरता जशी प्रदान करु नये तसेच प्रेमळता, सह्रदयता, दिव्यता, मूल्यांची जाणीव असते; असे म्हणूनही त्याचा गौरव करु नये. जग पूर्ण, सुंदर आणि उदात्त नाही, आणि तसे होण्याची त्याला इच्छाही नाही. जग मानवासारखे होण्यासाठी धडपड व प्रयत्न करीत नाही, तसेच मानवाच्या नैतिक आणि सौंदर्यशास्त्रीय निर्णयांचा त्याच्यावर कोणताही परिणाम होत नाही. आत्मपरिक्षणाची किंवा इतर कोणतीही प्रेरणा जगााच्या ठिकाणी नसते.

**5]फक्त अनिवार्यता :** जगाला कोणतेही नियम माहीत नसतात आणि कळत नसतात. जगाचे नियंत्रण नियम करीत असतात, असे आपण म्हणू नये. जगात काही असेलच तर त्या फक्त अनिवार्यता (Necessities) असतात. जगाला आदेश देऊन त्याच्यावर नियंत्रण चालविणारा कोणी नाही तसेच त्या आदेशाचे पालन किंवा उल्लंघन करणारेही कोणी नाही. जगात जशी ध्येये आणि आदर्श नाहीत, तसेच जगात अपघात किंवा अकस्मात घडणा-या घटनाही नाहीत. ज्या जगात निशिचत ध्येये किंवा आदर्श असतात त्याच जगात आगंतुकांना व अपघातांना वाव असतो. पण असे जग अस्तित्वातच नसते.

**6]मृत्यू :** मृत्युला जीवनाचे विरोधक किंवा प्रतिविधान (Antithesis) समजू नये.

## अव्यवस्था आणि आगुंतकता

नीत्शेचा जगातील गोंधळ, अव्यवस्था (Chaos) आणि आगुंतकता (Acciedent) यांच्याकडे पाहण्याचा द्विविध दृष्टीकोन आहे. नीत्शे अपघाताला किंवा 'आगंतुक' ला अपघात म्हणून आदर दाखवीत नाही. त्यांच्याशी सामना केला पहिजे असे तो म्हणतो. परंतु त्याचबरोबर तो येणाऱ्या अडचणीला, अपघाताला चांगली संधी समजतो. म्हणजे नीत्शेच्या मते अपघाताचाही आपले भले करण्याकरिता उपयोग करुन घेता आला पाहिजे, आणि म्हणून जग वाईट असले तरी हरकत नाही, पण आपण त्याचा उपयोग चांगल्या रितीने करुन घेऊ शकतो. त्याच्या मते, निसर्गात आणि जगात प्रत्यक्षात आगतुंकता आणि अव्यवस्था अस्तित्वात असते. ती स्वीकारावीच

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

लागते. जो ती स्वीकारतो तोच खरा शूर मनुष्य. शूर माणूस ***सुंदर गोधळ (Beautiful chaos)* किंवा *प्रिय अपघात (Dear accident)*** या दृष्टिकोनातून पाहतो आणि त्याच शब्दांतून व्यक्त करतो.

नीत्शेच्या मते, या जगाचे आपणांस बुद्धीवादी रितीने समर्थन करता येत नाही.कारण जगाचे स्वरूप पाहाता जगाला विवेकाचा आधार आहे, असे म्हणता येत नाही. घडणा-या असंख्य घटना चमत्कारीक, विसंगत आणि अविवेकी स्वरुपाच्या असतात. त्याचप्रमाणे ते जग इतक्या अनीतीने, दुराचरणाने, असत्याने आणि ढोंगबाजीने भरलेले आहे की त्याची घडण नैतिक हेतून झालेली असेल,असेही समर्थन करता येणे शक्य नाही. म्हणजे या जगाच्या निर्मितीला आणि व्यवहारांना (1)विवेकाचे आणि (2)नीतीचे अधिष्ठान नाही. मग जगाचा अर्थ लावण्याचा आणखी एक (3) मार्ग राहातो. आणि तो म्हणजे कलासर्जनाचा. एखाद्या चित्राकडे आपण जसे कलात्मक दृष्टीने पाहतो तसे आपण या जगाकडे पाहावे असे नीत्शे म्हणतो.



## खेळकर ईश्वर युक्तिवाद

हा युक्तिवाद नीत्शेच्या जगाकडे माणसाने कसे पाहावे ? म्हणजेच जग कसे समजावून घ्यावे आणि जगाशी आपले नाते कसे जोडावे हे स्पष्ट करताना मांडला गेला आहे.खरे तर ''ईश्वर मेला आहे'' अशी घोषणा करणारा नीत्शे ईश्वराविषयी तो अस्तित्वात असल्याचे सांगतो, हे विरोधी आहे. तथापि हा नीत्शेचा ईश्वरविषयक दृष्टिकोन आहे, हे नीटपणे लक्षात घेतले पाहिजे.

या जगाच्या निर्मात्याकडे सर्वश्रेष्ठ प्रज्ञा (Supreme Reason) किंवा नैतिक अधिशासक (Moral Governor) अशा दृष्टीने न पाहाता *एक श्रेष्ठ कलावंत* म्हणून पाहिल्यास या जगाच्या निर्मितीत आणि घडणीत असलेला अर्थ समजण्यास अंतदृष्टी मिळू लागते. बालके जसे वाळूचे किल्ले व घरे बांधतात, आणि ते मोडून टाकतात, पुन्हा करतात आणि असे खेळ खेळण्यात ती रंगून जातात. केवळ खेळणे आणि खेळण्याचा आनंद लुटणे एवढाच त्यांचा हेतू असतो. तसा विश्वकर्मा या जगातील असंख्य वस्तुंची निर्मिती, मोडतोड, जडणघडण सतत करतो, त्यातच आनंद उपभोगत असतो.[10]

नीत्शेच्या तत्वज्ञानास सौंदर्यात्मक सद्वस्तुशास्त्र समजले जाते. त्याच्या मते, जगत् निर्मात्याला सौदंर्य निर्माण करण्याची गरज वाटली आणि म्हणून जगाची निर्मिती झाली. आपण चित्र काढतो तसे ईश्वराने हे जग चितारले आणि रंगवले असेल, अशी आपण कल्पना करावी. चित्रकाराला चित्र काढताना जसा सर्जक आंनद होतो आणि निर्मितीच्या वेदनाही सहन कराव्या लागतात, तसा अनुभव जगत् निर्मात्यालाही आला असला पाहिजे; असे समजावयास पाहिजे.

## नीत्शे आणि भारतीय विचारवंत [11]

नीत्शेचा काही भारतीय विचारवंतावरही विलक्षण प्रभाव पडला. लोकमान्य टिळकांनी नीत्शेच्या तत्त्वज्ञानाची माहिती 'गीतारहस्य' मध्ये दिली. ती अहिताग्नी राजवाडे उर्फ शंकर रामचंद्र राजवाडे (1879 ते 1952) या महाराष्ट्रीय तत्त्वचिंतकाच्या वाचनात आली. त्यांना नीत्शेचे विचार पटले. त्यांनी समकालिन हिंदु समाजाला उपयुक्त तेवढा नीत्शे पुढे आणला आणि 'खिस्तान्तक नीत्शे' हे पुस्तक लिहिले. वीरांचा धर्म आणि दासवर्गाची धर्म (प्रभुनीती आणि दासनीती)हा भेद राजवाड्यांना फारच प्रेरक वाटला.

नीत्शेचा प्रभाव पडलेला दुसरा भारतीय विचारवंत म्हणजे तत्त्ववेत्ता महंमद इक्बाल होय.यांना अल्लामा इक्बाल या नावाने ओळखले जाते. ते तत्त्ववेत्ते ,राजकारणी आणि कवी होते. त्यांनी उर्दू आणि पर्शियन भाषेत मोठी साहित्य निर्मिती केली. त्यांना 'आधुनिक युगातील मुस्लिम तत्त्ववेत्ते' मानले जाते.

---


[10] हिरॅक्लिटस जगाकडे अशाच दृष्टीने पाहात असे.

[11] ``*राजवाडे. शं. रा.*'' , श्री. के. क्षीरसागर, मराठी तत्त्वज्ञान महाकोश, संपादक : दे. द. वाडेकर खंड 3 पान 528-29

*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@ssangamnercollege.org, 92265 63052*

---

**Sir Muhammad Iqbal**
(Urdu: محمد اقبال)
(November 9, 1877 – April 21, 1938), also known as **Allama Iqbal** (Urdu: علامہ اقبال).
A philosopher, poet and politician in British India who is widely regarded as having inspired the Pakistan Movement.
He is considered one of the most important figures in Urdu literature



**************************************************************

**प्रश्नः**

प्रश्न 1] 50 शब्द [10]

1. नीत्शे सत्याचे वर्णन कसे करतो ?

प्रश्न 2] 100 शब्दांत टीपा लिहा. [20]

1. ‘‘खेळकर ईश्वर युक्तिवाद’’
2. नीत्शेचा दृष्टिकोनवाद/सापेक्षतावाद.

प्रश्न 3] 200-250 शब्दात द्या. [30]

1. गुलामांची नीती आणि मालकांची नीती यात नीत्शेच्या मते कोणता फरक आहे

प्रश्न 4] 500 शब्दांत लिहा. [20]

1. सत्तेची इच्छा या नीत्शेच्या सिध्दांताची सखोल चर्चा करा.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner